श्री

विभाग क्रमांक
सरकारी मुल्यांकन
मुद्रांक शुल्क
रेरा नोंदणी क्रमांक

मोबदला रक्कम
नोंदणी फी
दिनांक

डिड ऑफ अपार्टमेंट

(फ्लॅट मिळकतीचे फरोक्त खरेदीखत)

डिड ऑफ़ अपार्टमेंट फ्लॅट मिळकतीचे फरोक्त खरेदीखत

आज तारीख . रोजी या दिवशी लिहीले.

१) ---------- वय
धंदा नोकरी रा.
अमळनेर जि. जळगांव
पॅन नंबर
मोबाईल नंबर
आधार क्रमांक

२) ---------- वय
धंदा नोकरी रा.
अमळनेर जि. जळगांव
पॅन नंबर
मोबाईल नंबर
आधार क्रमांक

लिहुन घेणार

१) **सचिन सुर्यकांत भामरे** वय ३४
धंदा - व्यापार रा. कचेरी समोर,
धुळे रोड, अमळनेर ता. अमळनेर
जि. जळगाव मो.नं. ९८३४६२४५०४
आधार क्रमांक ७६७५ १७०२ ३७२२
पॅन नंबर ऐ एल डी पी बी २०८७ जे

लिहुन देणार

कारणे बांधीव मिळकतीचे फरोक्त खरेदीखत (डिड ऑफ अपार्टमेंट) वा दस्त लिहुन देतो ऐसा जे की,

१) **मिळकतीचे वर्णन -**

तुकडी जिल्हा जळगांव व जिल्हा परिषद जळगांव पोट तुकडी तालुका अमळनेर पैकी कसबे **अमळनेर** येथील न पा हद्दीतील मिळकत यासीं **टि पी नंबर १६९/क याचे एकुण क्षेत्र १४७२.६ चौ मी यापैकी क्षेत्र ८६०.४६ चो मी** या मिळकतीवर अमळनेर नगर परीषद अमळनेर यांचे मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे बांधकाम पुर्ण झालेल्या **सनशाईन टॉवर** या इमारतीमधील --------- **मजल्यावरील फ्लॅट नंबर याचे कार्पेट क्षेत्र चौ मी** म्हणजेच चौरस फुट यात १ हॉल, १ किचन, -- बेडरुम संडास बाथरुमसह हि मिळकत.

सदर मिळकतीचे बांधकाम ज्या बिनशेती प्लॉट मिळकतीवर सुरु आहे त्या प्लॉट मिळकतीचे सविस्तर वर्णन परीशिष्ट १ मध्ये केलेले असुन बांधीव सदनिकेचे वर्णन परीशिष्ट २ मध्ये केलेले आहे. व बांधीव सदनिकेत पुरविण्यात येणाऱ्या सुखंसुविधांचे वर्णन परीशिष्ट ३ मध्ये केलेले आहे. सदरील लेखात लिहुन देणार यांचा उल्लेख मी / आम्ही तसेच लिहुन घेणार यांचा उल्लेख तुम्ही आणि परीशिष्ट २ मधील विक्री करावयाच्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख सदरील मिळकत असा संक्षिप्ततेसाठी केलेला आहे.

२) **मिळकतीचा इतिहास-**

वर कलम १ मधील वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही लिहुन देणार यांची

खरेदी मालकीची तसे च प्रत्यक्ष कब्जा वहीवाटीतील अशी असुन सदरची मिळकत ही लिहुन देणार यांनी मोहन रामलाल जैन वगैरे यांचेकडून कायमचे फरोक्त खरेदीखताने विकत घेतलेली असुन तसा फरोक्त खरेदीखताचा दस्त त्यांनी लिहुन देणार यांच्या लाभात दिनांक ०९/०५/२०१९ रोजी लिहुन देऊन म. दुय्यम निबंधक सो अमळनेर वर्ग २ यांच्या कार्यालयात दस्त क्रमांक २१९३/२०१९ अन्वये नोंदवुन दिलेला असुन रेकॉर्ड ऑफ राईट सदरी लिहुन देणार यांचे नावाची नोंद सदर दस्तान्वये झालेली आहे. सदर प्लॉट मिळकत ही लिहुन देणार यांचे प्रत्यक्ष कब्जा वहीवाटीत मालकी हक्काने आहे. सदर प्लॉट मिळकतीचे लिहुन देणार हे कायदेशीर मालक असल्याने सदर प्लॉट मिळकतीचा पाहीजे तशी विल्हेवाट लाण्याचा अगर विक्री करण्याचा त्यांना मालकी हक्काने हक्क व अधिकार आहे.

उपरोक्त वर्णन केलेली बांधीव मिळकत ही लिहुन देणार यांचेच प्रत्यक्ष कब्जा वहीवाटीतल व हक्क उपभोगातील अशी असुन सदर मिळकतीत लिहुन देणार हेच कायदेशीर मालक आहेत. उपरोक्त वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही विक्री करण्याचा लिहुन देणार यास पुर्णपणे कायदेशिर हक्क व अधिकार आहे. सदर सनशाईन टॉवर या इमारतीमधील सदर दस्ताचा विषय असलेली बांधीव मिळकत म्हणजे ------- **मजल्यावरील फ्लॅट नंबर -- यासी कार्पेट क्षेत्र चौ मी म्हणजेच -- चौ फुट (यात १ हॉल,१ किचन, --- बेडरुम संडास बाथरुम)** या बांधीव मिळकतीचे कायमचे खरेदीखत (डिड ऑप अपार्टमेंट) लिहुन व मे. दुय्यम निबंधक साहेब अमळनेर यांचे समोर नोंदवुन देण्याचा तसेच फ्लॅट मिळकतीचा किमतीचा भरणा स्विकारण्याचा लिहुन देणार यांस पुर्णपणे कायदेशिर मालकी व अधिकार आहे.

३) वरील वर्णनातील व चतुसिमा पुर्वक मिळकत ही माझ्या स्वकष्टार्जीत मालकी हक्काची आहे. लिहुन देणार यांनी **सनशाईन टॉवर** इमारत ही बांधकाम करुन नफा मिळवण्याच्या उद्देशाने विक्री करणेकामी बांधलेली असल्यामुळे त्यांना सदर मिळकती मधील फ्लॅट हे विक्री करावयाचे होते. तुम्हास उपरोक्त फ्लॅट मिळकतीबाबत

हस्ते परहस्ते माहीती झालेनंतर तुम्हास सदरची मिळकत खरेदी घेणे सोईस्कर व उपयुक्त असल्यामुळे तुम्ही ती खरेदी घेण्याचा प्रस्ताव मला दिला व तो मी स्विकारला व खालील मुद्यांवर उभयंतात दरम्यान व्यवहार निश्चित होऊन आज रोजी मिळकतीचा डिड ऑफ अपार्टमेंट चा दस्त आज रोजी मी तुमचे लाभात लिहुन व नोंदवुन देत आहे.

४) तुम्हास या खरेदीखताने दिलेली फ्लॅट मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची ,निष्कर्जी अशी असुन वरील मिळकत तारण ठेऊन मी कोणत्याही वित्तीय संस्थेचे अगर खाजगी संस्थेचे कर्ज घेतलेले नाही. उपरोक्त मिळकतीवर मागील काही बोजे आढळुन आल्यास त्याचे निवारण मी माझ्या पदरखर्चाने करुन देईल त्यावी कुठल्याही प्रकारची तोषीस तुम्हास अगर तुम्हास खरेदी द्यावयाच्या मिळकतीस होऊ देणार नाही. उपरोक्त मिळकतीवर कोणत्याही प्रकारे गहाण,दान, लीज, अन्नवस्त्र ,मृत्युपत्र,करार,मदार व इतर जडजोखमात गंतवलेली नाही.खरेदी दिलेल्या बांधीव मिळकती संबंधाचे कोर्ट वाद, कोर्ट मनाई या अन्य प्रकारे बोजा नाही.

उपरोक्त मिळकती संदर्भात तुम्ही सोडून इतर कोणाचाही तोंडी अथवा लेखी करार मदार नव्हता व नाही.आता सदर मिळकतीवर माझा अगर माझ्या वाळीवारसांचा कोणताही हितसंबंध राहीलेला नाही.

५) सदर मिळकत विक्री अगर हस्तांतरण करु नये याबाबत कोणत्याही न्यायालयाचा अथवा प्राधिकरणाचा मनाई आदेश आज पावेतो लिहुन देणार यांना प्राप्त नाही.सदर बांधीव मिळकत ही रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव अगर वीजमंडळाची उच्च दाबाजी वायर जात असल्या करणाने बाधीत होत नाही.भविष्यात याबाबत काही एक वाद अगर तक्रार निर्माण झाल्यास त्याचे निवारण लिहुन देणार हे आपल्या पदरखर्चे करुन देतील त्याची तोषीस लिहुन घेणार यास लागु देणार नाही.

६) सदर मिळकतीबाबत लिहुन देणार यांस केंद्र सरकार, राज्य सरकार,जिल्हा परीषद,जळगाव अथवा तत्सम कोणत्याही शासकीय अगर निमशासकीस,लष्करी अथवा मुलकी संस्थेचा वा अधिकाऱ्याची ॲक्वाझिशन नोटीस प्राप्त झालेली नाही.अथवा तसा प्रस्ताव नाही.तसेच कोणत्याही प्रकारच्या लिज पेंडन्सीबाबत कोणतीही नोटीस

आलेली नाही.तसेच सदरची बांधीव घर मिळकत ही कोणत्याही शासकीय संस्थेचा संपादनाचा विषय नाही.

७) आवश्यक परवाणग्या-

अ) तसेच वर नमुद मिळकत ही रहिवास प्रयोजनासाठी वर्गीकरण करण्यात आलेली आहे. त्यासाठी म. उपविभागीय अधिकारी सो अमळनेर यांचेकडील क्र. अनधिकृत बिनशेती / एस आर / ३९/२०१० अन्वये दिनांक २१/०१/२०११ रोजीची परवाणगी घेण्यात आलेली आहे.सदरची परवाणगीची छायांकीत प्रत दस्तासोबत जोडलेली आहे.

ब) तसेच सदर मिळकतीचे अपार्टमेंट चे तळ मजला दुकाने ,पहिला मजला, दुसरा मजला व तिसरा मजला बांधकाम करणेकामी म. मुख्याधिकारी सो अमळनेर न प अमळनेर यांचेकडून जा.क्र.वशि -१३/९५७/२०२१ अन्वये दिनांक १२/०१/२०२१ रोजी परवाणगी दिलेली आहे. त्याचा वापर रहिवास व वाणिज्य कामासाठी होणार आहे.

क) उपरोक्त नमुद बिल्डींग प्लॅनप्रमाणे लिहुन देणार यांनी परीशिष्ट अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर

सनशाईन टॉवर या इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. त्याप्रमाणे भोगवटा दाखला (बांधकाम पुर्णत्वाचा दाखला) म.मुख्याधिकारी सो अमळनेर नगर परीषद अमळनेर यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक -------- दिनांक -- जावक क्रमांक -- अन्वये दिलेला आहे.

८) लिहुन देणार यांनी सदरचा प्रकल्प रियल इस्टेट (रेग्युलेशन डेव्हलपमेंट) ॲक्ट २०१६ (रेरा) अन्वये रियल इस्टेट रेग्युलेटरी प्राधिकरण मुंबई यांचेकडे प्रकरण दाखल करुन त्याप्रमाणे संबंधीत कार्यानयाने रजिष्ट्रेशन नंबर रेरा नोंदणी क्रमांक ------ दिनांक --- अन्वये सदरचा प्रकल्प नोंदणी केलेला असुन तसा नोंदणीचा दाखला प्रस्तुत दस्तासोबत जोडलेला आहे.

९) लिहुन देणार हे सदर प्लॉट मिळकतीवर मंजुर इमारत बांधकाम नकाशाप्रमाणे ----- चौ मी ऐवढे बांधकाम केलेले आहे.

१०) रेरा कायदा (रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट) ॲक्ट २०१६ चे तरतुदीनुसार व लिहुन घेणार यांचे मागणी प्रमाणे लिहुन देणार विकसन यांनी परीशिष्ट १ यात वर्णन केलेल्या मिळकतीच्या स्वामित्वाबाबतचे सर्व कायदेशीर दस्तऐवज ,नगरपरीषदेकडील मंजुर इतारत नकाशा तसेच प्रकल्पाचे साईट ऑफीसवर अथवा विकसक यांचे कार्यालयात अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत.

११) लिहुन देणार यांनी मिळकतीचे ७/१२ उतारे व फेर फार नोंदी तसेच इतर महसुल खात्यातील परवाणग्या लिहुन घेणार यांचे अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिलेल्या असुन सदर प्रती दस्ताऐवजा सोबत जोडून दिलेल्या आहेत.

१२) लिहुन देणार विकासक यांनी परीशिष्ट १ यात वर्णन केलेल्या मिळकर्तीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतीचा मंजुर आराखडा सदर दस्तासोबत जोडून दिलेला आहे.

१३) लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना अमळनेर नगर परीषद यांचेकडील मंजुर इमारत नकाशाबाबतची पुर्ण माहीती दिलेली असुन लिहुन देणार हे मंजुर विकास नियमानुसार संपुर्ण एफ एस आय नुसार मंजुर बांधकामाचा उपभोग घेणार असुन यदाकदाचीत भविष्यात विकास नियमावलीत बदल झाल्यास सदर नवीन विकास नियमावलीनुसार वाढीव बांधकाम करण्याची परवाणगी लिहुन देणार यांनी अमळनेर नगर परीषद यांचेकडून मिळाल्यास सदरचे वाढीव बांधकाम करण्याचा अधिकार लिहुन देणार यांना राहील.सदरचे वाढीव बांधकाम लिहुन देणार हे आज मंजुर असलेल्या मजल्यांचेच करतील. त्याकामी लिहुन घेणार यांनी कोणतीही आडकाठी निर्माण करावयाची नाही.

१४) लिहुन घेणार सदर मिळकतीचे बांधकामाचा दर्जा ,बांधकामासाठी लागणाऱ्या कच्या मालाचा दर्जा इमारतीमधील पुरविण्यात येणाऱ्या सुखसुविधा,फिटींग फिक्चर्स याबाबतची संपर्ण खात्री करुन घेतली असुन त्याबाबत लिहुन घेणार यांचे संपुर्ण समाधान झालेले आहे.

१५) लिहुन घेणार खरेदी घेत असलेल्या सदनिकेचे चटई क्षेत्र --- चौ मी इतके

असुन सदर चटई क्षेत्र कॉलम, बीम,बालकणी,टेरेस,व्हांडा,पॅसेज हे वगळुन असेल.
१६) लिहुन देणार यांच्या मालकी हक्काबाबत संपुर्ण कागदपत्रांची लिहुन घेणार यांनी पहाणी व तपासणी करुन मालकी हक्काबाबत खात्री करुन घेतलेली असुन सदरचे मिळकतीत लिहुन घेणार हे वाणिज्य व रहिवास स्वरुपाचे बांधकाम झालेल्या इमारतीच्या बांधकामाच्या दर्जाची व स्वरुपाची खात्री लिहुन घेणार यांनी करुन घेतलेली असुन त्या बद्दल त्यांची पुर्ण खात्री व समाधान झालेले आहे.त्याबाबत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही.परीशिष्ट १ मध्ये वर्णन केलेल्या बिनशेती प्लॉट मिळकतीवर बांधकाम पुर्ण झालेल्या **सनशाईन टॉवर** या इमारतीमधील परीशिष्ट २ मध्ये वर्णन केलेली सदनीका मिळकत लिहुन घेणार यांनी खरेदी घेण्याचे ठरविले असुन त्यानुसार लिहुन घेणार आणि लिहुन देणार यांचेमध्ये बोलनी होऊन खालील अटी व शर्तीवर लिहुन देणार हे लिहुन घेणार यांचे लाभात डिड ऑफ अपार्टमेंटचा दस्त लिहुन म. दुय्यम निंबधक साहेब अमळनेर यांचे कार्यालयात नोंदवुन देत आहेत.
१७) लिहुन घेणार यांनी परीशिष्ट १ व २ यात वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भाने मिळकतीचे टायटल स्वच्छ ,पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची असल्याबाबत मिळकती संबधाने असलेली कायदेशीर कागदपत्र तसेच वर नमुद केलेल्या आवश्यक त्यासर्व परवाणग्या बघुन व माहीती करुन घेऊन पुर्णपणे खात्री करुन घेतलेली आहे.तसेच लिहुन देणार हे सदर मिळकतीचे टायटल निर्वेध ठेवणार असल्याचे सांगितले असुन सदर मिळकत कोठेही गहाण,दान,लिन लिज,साठेखत,करारनामा वा अन्य कुठलेही कारणाने गुंतवलेली नाही.
१८) परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या सदर कराराचा विषय असलेली सदनीका मिळकत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना विक्री करण्याचे ठरविले आहे.त्याप्रमाणे सदनीका मिळकतीची उक्ती किंमत **रक्कम रुपये ---- अक्षरी रुपये --- मात्र** इतकी उभयंतामध्ये ठरविण्यात आलेली असुन सदरची किंमत आजच्या प्रचलित बाजार भावाप्रमाणे योग्य व बरोबर आहे.सदर मोबदला किंमतीबाबत
लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेमध्ये कोणताही वाद अगर तक्रार नाही.सदरचा

मोबदला किंमतीचा सदनिका मिळकतीच्या क्षेत्रफळाशी कोणताही संबंध नाही.सदर मोबदला रक्कमेचे प्रदान हे भरण्याचे तपशिलात वर्णन केल्याप्रमाणे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना दिलेले आहे.

१९) भरण्याचा तपशिल -

---------- /- **अक्षरी रुपये** ---------- मात्र चा भरणा लिहुन घेणार यांनी त्यांचे खाते असलेली बँक शाखा --- या शाखेतुन एन इ एफ टी क्रमांक -------- व्दारे दिनांक रोजी लिहुन देणार यांना त्यांचे खाते असलेल्या बँकेत वर्ग केला आहे.सदरचा भरणा पावला व भरण्याबाबत तक्रार नाही.

----------/- **अक्षरी रुपये** ---------- मात्र मात्रचा भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना त्यांच्या कर्ज खाते असलेल्या ---------- बँक शाखा--- -- या शाखेचा दिनांक ----- रोजीचा डि डि क्रमांक अन्वये अदा केला.भरण्याबाबत तक्रार नाही.

एकुण भरणा -

----------/- **अक्षरी रुपये ------ मात्र.**

२०) सदरील **सनशाईन टॉवर** या इमारतीचा महाराष्ट्र अपार्टमेंट फ्लॅटस (रेग्युलेशन ॲण्ड कन्स्ट्रक्शन ,सेल मॅनेजमेंट ॲण्ड ट्रान्सफर ॲक्ट) १९६३ ओनरशीप ॲक्ट (महा.ॲक्ट नं. एक्स वाय १९७१) चे अटी व शर्तीस अनुसरुन अपार्टमेंट डिक्लेरेशनचा दस्त लिहुन देणार यांनी म. दुय्यम निबंधक सो अमळनेर वर्ग २ यांचे समोर दिनांक ---- रोजी दस्त क्रमांक --- अन्वये नोंदवुन दिलेला आहे मात्र सदर डिड ऑप अपार्टमेंट / खरेदीखत पोटी येणारा सर्व खर्च लिहुन घेणार यांनी त्यांचे येणारे हिश्शेराशीप्रमाणे अधिकचा करावयाचा आहे.

२१) परीशिष्ट २ यात फ्लॅट / सदनिका मिळकतीचा उपयोग लिहुन घेणार यांनी सुज्ञ व्यक्ती प्रमाणे करावयाचा असुन इमारतीतील इतर सभासदांना कुठल्याही

प्रकारचा त्रास होणार नाही किंवा कुठलीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता लिहुन घेणार यांनी घ्यावयाची आहे.त्याच प्रमाणे एकुण इमारतीमधील सामाईक पॅसेज,सामाईक टेरेस,जिने व ज्या सामाईक उपयोगाच्या बाबी आहेत त्यांची देखभाल ,निगा,स्वच्छता लिहुन घेणार यांनी राखावयाची आहे.एकुण इमारतीचा बाह्य भाग तसेच इतारतीचा सामाईक पॅसेज मध्ये कच्चे अगर पक्के बदल करण्याचा लिहुन घेणार यांना हक्क व अधिकार नाही.तसेच एकुण इमारतीच्या सौंदर्याला बाधा होईल असे कुठलेही कृत्य लिहुन घेणार यांनी करावयाचे नाही.

२२) परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या मिळकतीत कुठल्याही प्रकारचे पाळीव ,चतुष्पाद उदा. गाय,म्हैस इ. मोठे पाळीव प्राणी पाळवयाचे नाही अथवा सामाईक जागेमध्ये आणुन ठेवावयाचे नाही.

२३) परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या फ्लॅटच्या खरेदी किंमती व्यतिरीक्त लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना अमळनेर नगर परीषद यांचेकडील पाणी पुरवठा तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून पुरवठा संबंधाचे विज मीटर ,कनेक्शन,मिटरची अनामत,केबल,डि पी साठी ,तसेच इमारतीतील सामाईक कनेक्शनसाठी असलेले हिस्सेराशीप्रमाणे होणारी रक्कम रुपये ----- अक्षरी रुपये ---- मात्र लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना मागणनुसार देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.सदर अपार्टमेंटचे मेन्टेनन्स पोटी लिहुन घेणार यांनी रक्कम रुपये ----- अक्षरी रुपये ---- मात्र प्रति महिना लिहुन देणार यांच्याकडे अदा करावयाची आहे.एक वर्षानंतर सदर अपार्टमेंटचा मेन्टेनन्स हा अपार्टमेंटच्या कार्यकारणी कडे असेल मेंटेनन्स बाबतचे सर्व अधिकार अपार्टमेंटच्या कार्यकारणीस असतील.

२४) सदर मिळकतीचे बांधकामाविषयी ,पाणीपुरवठा, विजपुरवठा, महाराष्ट्र सरकार,अमळनेर नगर परीषद,महावितरण कंपनी यांनी जे कायदे ,नियम, अधिनियम आदेश केलेले आहेत किंवा वेळोवेळी देतील याचे पालन करावयाचे लिहुन घेणार यांचेवर बंधनकारक राहील.

२५) लिहुन देणार हे परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या फ्लॅट / सदनिका मिळकतीचे बांधकाम उच्च प्रतीच्या कच्या मालाचा उपयोग करुन करणार असुन हवामानाच्या

सततच्या बदलामुळे तसेच उपलब्ध कच्यामालामुळे बांधकामास तडे जाण्याची शक्यता आहे,ही बाब लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना सांगितलेली असुन त्याबाबत लिहुन घेणार यांचे समाधान झालेले आहे.सदर बाबी विषयी लिहुन घेणार हे भविष्यात कुठल्याही हरकती उपस्थित करणार नाहीत.

२६) परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या फ्लॅट / सदनिका मिळकतीचा ताबा लिहुन घेणार यांना मिळाल्यानंतर सदर मिळकतीची देखभाल,दुरुस्ती वगैरे संपुर्ण जबाबदारी ही लिहुन घेणार यांचीच राहील.तसेच सदर मिळकतीचा उपयोग रहिवासी उपयोगाकरीताच करण्याची परवाणगी अमळनेर नगर परीषद यांनी दिलेली असल्याने रहिवासी उपयोगाव्यतिरीक्त उपयोग लिहुन घेणार यांनी करावयाचा नाही. लिहुन घेणार यांनी सदर मिळकतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी केल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाहीस लिहुन घेणार हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

२७) प्रस्तुत करार हा महाराष्ट्र ओनरशीप ॲक्ट १९७० व अपार्टमेंट ॲक्ट १९६३ चे तरतुदीचा अधिन राहुन लिहुन दिलेला आहे.

२८) परीशिष्ट २ यात वर्णन केलेल्या फ्लॅट / सदनिका मिळकतीचा कब्जा मिळाले पश्चात सदर मिळकतीचे निरंतरचे देखभाली पोटी तसेच सामाईक खर्च जसे साफसफाई,चौकीदार,सामाईक विद्युत आकार,सामाईक पाणी पुरवठा आकार,लिफ्ट व इतर देखभाल दुरुस्ती परीशिष्ट १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती संदर्भाने दर वर्षीचा बिनशेतीकर लिहुन घेणार यांनी हिश्शेराशीने भरावयाचा आहे.

२९) सदर इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांना तळमजल्यावर सामाईक पार्किंग देण्यात आलेली आहे. लिहुन घेणार यांना अशा सामाईक पार्किंगच्या जागेतच त्यांनी त्यांची वाहने पार्किंग करावयाची आहे.

३०) परीशिष्ट १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीबाबतचा आजमितीस असलेला एफ.एस.आय.तसेच भविष्यात एफ.एस.आय.मध्ये वाढ झाल्यास त्यावर लिहुन देणार यांचा अधिकार राहील.

३१) सदरच्या खरेदीखताने उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे तुम्हास मालक केलेले आहे.वरील खरेदी दिलेल्या फ्लॅट मिळकतीचा ताबा तुम्ही स्विकारलेला आहे.तसेच

तो आज रोजी तुम्हास कायदेशीररीत्या निरंतरसाठी कायम करुन दिलेला आहे.यापुढे तुम्ही सदर मिळकतीचे मालक झालेले असल्यामुळे वरील मिळकतीचा निरंतर पुत्र पौत्रादी वापर उपभोग घ्यावा.तुमचे वापर उपभोगास तसेच वहीवाटीस मी व माझे वतीने आमचे वालीवारस तसेच माझे वतीने हक्क सांगणारे कोणीही हरकत अडथळा करणार नाही.प्रस्तुतचा दस्त हा माझेवर व तुमचेवर तसेच आपणातर्फे हक्क सांगणारे,वालीवारस,भागीदार इ. यांचेवर बंधनकारक आहे व राहतील.

३२) प्रस्तुत खरेदीखताचा संपुर्ण खर्च जसे मुद्रांक शुल्क,नोंदणी फी,लिहीनावळ, नोंदनावळ,दस्त तयार करण्याची फी इ.संपुर्ण खर्च लिहुन घेणार यांनी केलेला व सोसलेला आहे.

येणे प्रमाणे प्रस्तुतचे डिड ऑफ अपार्टमेंट (फ्लॅट मिळकतीचे फरोक्त खरेदीखत) दस्त लिहुन देणार यांनी आज रोजी भरणा तपशिलाप्रमाणे मोबदला स्विकारुन ,समजुन,उमजुन, राजीखुषीने, स्वसंतोषाने निर्माण होणाऱ्या परीनामांची जाणीव ठेऊन कोणाच्याही दडपणाशिवाय अगर कुठल्याही नशेच्या अमलांशिवाय खालील साक्षीदारांसमक्ष अमळनेर मुक्कामी दुय्यम निंबधंक साहेब वर्ग २ अमळनेर यांचे कार्यालयात लिहुन नोंदवुन ठेवला आहे.

परिशिष्ट - १

तुकडी जिल्हा जळगांव व जिल्हा परिषद जळगांव पोट तुकडी तालुका अमळनेर पैकी कसबे **अमळनेर** येथील न पा हद्दीतील मिळकत यासीं

टि पी नंबर १६९/क याचे एकुण क्षेत्र १४७२.६ चौ मी यापैकी माझ्या मालकीचे क्षेत्र ८६०.४६ चौ मी

: यासी चतु:सिमा :

पुर्वेस -: टि पी नंबर १३९ **पश्चिमेस** -: रस्ता व वापर

उत्तरेस -: टि पी नंबर १६९/ब **दक्षिणेस** -: टि पी नंबर १६२

येणे प्रमाणे चतुसिमापुर्वक वर्णनाची प्लॉट मिळकत जल,तरु,काष्ट,

पाषाण, निधी निक्षेप,तदंगभुत वस्तुसह तसेच मिळकतीत जाण्या येण्याचे वागवहीवाटीचे हक्कात तसेच कॉलनी रोड,ओपन स्पेस,अमळनेर नगर परीषदेचे लाईट सामाईक वापराचे हक्कासह दरोबस्त प्लॉट मिळकत.

परिशिष्ट - २

परीशिष्ट १ या वर्णन केलेल्या मिळकतीवर अमळनेर नगर परीषद अमळनेर यांचे मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे बांधकाम करण्यात आलेली इमारत सनशाईन टॉवर या इमारती मधील ----- मजल्यावरील फ्लॅट नंबर -- यासी कार्पेट क्षेत्र --- चौ मी म्हणजेच --- चौ फुट यात यात १ हॉल, १ किचन, -- बेडरुम संडास बाथरुमसह हि मिळकत यासी चतुसिमा खालील प्रमाणे -

पुर्वेस-

पश्चिमेस-

उत्तरेस-

दक्षिणेस -

येणे प्रमाणे नकाशात दर्शविलेली फ्लॅट मिळकत जिने,कॉमन टेरेस,तसेच लाईट पाणी व कॉलनी रोड,इतर सामाईक मालकी हक्काचे वापराचे जाने येण्याचे वाग वहीवाटीचे हक्कासह मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे बांधकाम करण्यात आलेली फ्लॅट मिळकत दरोबस्त.

परिशिष्ट - ३

सुखसोयी (ॲमेनिटीज)

अ) सदर फ्लॅट बांधकाम आर सी सी स्वरुपाचे व भुकंप रोधक आहे.

ब) ब्रिक वॉल ४ व ६ इंच प्रमाणे आहे.

क) प्लॅस्टर हे आतुन फिनीशिंग असेल व बाहेरुन सॅन्ड फेस प्लॅस्टर आहे.

ड) टॉयलेट मध्ये डॅडो ४ फुट ॲन्टी स्लाईड सिरॅमीक फ्लॉरींग आहे.

इ) दरवाजे फ्लश डोअर व मुख्य दरवाजा लॅमीनेट व कडी कोन्डा आहे.

उ) कलर (आप आपसात ठरल्या प्रमाणे)

ऊ) इलेक्ट्रीक फिटींग कंसिल वायरींगमध्ये आहे.
ए) किचन ग्रेनाईट,स्टेनलेस स्टिल सिंक आणि २ फुट डॅडो आहे.
हे डिड ऑफ अपार्टमेंट
स्थळ - अमळनेर
दिनांक -

येणे प्रमाणे प्रस्तुतचे डिड ऑफ अपार्टमेंट (फ्लॅट मिळकतीचे फरोक्त खरेदीखत) दस्त लिहुन देणार यांनी आज रोजी समजुन, उमजुन, राजीखुषीने, स्वसंतोषाने कोणाच्याही दडपणाशिवाय अगर कुठल्याही नशेच्या अमलां शिवाय खालील साक्षीदारांसमक्ष अमळनेर मुक्कामी दुय्यम निंबधंक साहेब वर्ग २ अमळनेर यांचे कार्यालयात लिहुन नोंदवुन ठेवला आहे.

लिहून देणार सही नाव फोटो अंगठा

लिहून देणार सही

१)----------

नाव - सचिन सुर्यकांत भामरे

लिहून घेणार सही

१) ----------

नाव - ----------

२) ----------

नाव - ----------

साक्षीदार

१---------- २----------

प्रतिज्ञापत्र

सदर दस्त ऐवज हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या तरतुदी नुसारच नोंदणीस दाखल केलेला आहे.दस्तातील संपुर्ण मजकुर निष्पादक व्यक्ती ,साक्षीदार व सोबत जोडलेल्या कागदपत्रांची आणि दस्ताची सत्यता, वैधता ,कायदेशीर बाबीसाठी खालील दस्त निष्पादक व कबुलीधारक हे संपुर्णपणे जबाबदार राहतील.

लिहुन देणार सही १) ----------

लिहुन घेणार सही १) ----------

२) ----------